# बॅकेत व्यवहार करताना घ्यावयाची काळजी

1. बँकेतुन रक्कम काढताना अगर भरावयास जाताना जर रक्कम मोठी असेल तर साथिदारांना सोबत घेवून जा, अगर पोलीसांना माहिती देवून त्यांचे सहकार्य घ्या. बँकेत दैनंदिन व्यवहार करणाऱ्या इसमावर पाळत ठेवून त्याच्या रक्कमेची चोरी केली जावू षकते.
2. बॅकेचा व्यवहार करते वेळी कोणत्याही अनोळखी इसमाबरोबर बोलु नका अथवा आपली रक्कम मोजण्यासाठी इतरांच्या हातात देवु नका.
3. बॅकेतून पैसे काढल्यावर रस्त्यात कोठेही थांबु नका. अनेकदा गुन्हेगार आपला पाठलाग करून प्रसंगी आपणास रस्त्यात अडवुन अथवा घर अगर कार्यालयाजवळ आपली बॅग हिसकावली जावू शकते.
4. जे व्यापारी दररोज बँकेमध्ये रक्कम भरण्यासाठी जातात, त्यांनी वेळ आणि मार्ग यामध्ये नेहमी बदल करावा. शक्यतो एकच व्यक्ति रक्कम भरायला जाणार नाही याची काळजी घ्यावी. रक्कम मोठी असल्यास एकदाच न भरता दोन ते तीन टप्प्यात तिचा भरणा करावा.
5. बॅकेतुन काढलेली रक्कम बॅगमधुन घेवुन जाताना एखादया इसमाने आपल्या अंगावर घाण पडल्याचे अथवा तुमचे पैसे खाली पडल्याचे सांगितल्यास त्याच्याकडे दुर्लक्ष करा.
6. एटीएम मशिनमधुन पैसे काढताना वॉचमन असल्याची खात्री करा. त्याचप्रमाणे एटीएम मशिनला काही अन्य वस्तू (स्किमर/कॅमेरा) लावलेली नाही याची खात्री करावी.
7. एटीएम कार्डचा पिन नंबर कोणालाही देवु नका. हॉटेलमध्ये अथवा खरेदी केलेल्या ठिकाणी पैसे देण्याकरिता शक्यतो एटीएम कार्ड देवु नका, जेणेकरून त्याचा डाटा चोरीला जाणार नाही.